# वनविभाग लेखापाल भरती

## संपूर्ण जाहिरात

- एकूण जागा
- शैक्षणिक पात्रता
- अभ्यासक्रम
- पुस्तक यादी
- पेपर पॅटर्न
- वेतनश्रेणी

# वनविभाग लेखापाल

## ऑनलाईन कोर्स

**सर्व 4 विषयसाहित बॅच**

वैशिष्ट्ये :-

- मोफत नोट्स ,टेस्ट ,ई-बुक
- Digital Board वर लाईव्ह क्लास
- रेकॉर्डेड लेक्चर
- मोफत टेस्ट सिरीज
- जुन्या प्रश्नपत्रिका विश्लेषण
- लेक्चर मिस झाल्यावर अनलिमिटेड वेळा पाहू शकता.

कोर्स फी 1500/-

संपर्क 8010457760 / 9923570901

**नवीन बॅच सुरू**

महाराष्ट्र वन विभाग

# जाहीरात

## प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे कार्यालय

**“वनभवन”, रामगिरी रोड, सिव्हिल लाईन्स, नागपूर – ४४० ००१**

**वन विभागातील लघुलेखक (उच्चश्रेणी) (गट ब) (अराजपत्रित), लघुलेखक (निम्नश्रेणी) (गट ब) (अराजपत्रित), कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) (गट ब) (अराजपत्रित), वरिष्ठ सांख्यिकी सहाय्यक (गट-क) व कनिष्ठ सांख्यिकी सहाय्यक (गट-क) भरती प्रक्रिया सन २०२३**

**जाहीरात क्रमांक कक्ष-७/१** — **दिनांक ८/६/२०२३**

वन विभागातील लघुलेखक (उच्चश्रेणी) (गट ब) (अराजपत्रित), लघुलेखक (निम्नश्रेणी) (गट ब) (अराजपत्रित), कनिष्ठ अभियंता (स्थापत्य)(गट ब) (अराजपत्रित), वरिष्ठ सांख्यिकी सहाय्यक (गट-क) व कनिष्ठ सांख्यिकी सहाय्यक (गट-क) ही पदे सरळसेवेने भरावयाची आहेत. त्यासाठी अर्हता धारक उमेदवारांकडून विहित नमुन्यात अर्ज फक्त ऑनलाईन पध्दतीने www.mahaforest.gov.in या संकेतस्थळावर भरती प्रक्रिया (Recruitment) या टॅबमध्ये उपलब्ध लिंकवर मागविण्यात येत आहे. सदर संकेतस्थळावर सविस्तर जाहीरात उपलब्ध असून उमेदवारांनी संपूर्ण माहिती काळजीपूर्वक समजून घेऊनच ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करावेत. प्रस्तुत पदांकरिता केवळ उक्त संकेतस्थळाववरील लिंकवर विहीत ऑनलाईन पद्धतीनेच केलेले अर्ज व ऑनलाईन पद्धतीनेच परीक्षा शुल्क स्वीकारण्यात येईल. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. भरती प्रक्रियेदरम्यान वेळोवेळी संकेतस्थळ पाहून भरती प्रक्रियेच्या माहितीबाबत अद्ययावत राहण्याची जबाबदारी उमेदवारांची राहील.

| **ऑनलाईन अर्ज भरण्याची सुरुवात** | **ऑनलाईन अर्ज भरण्याची अंतिम मुदत** |
|---|---|
| दिनांक १०/६/२०२३ | दिनांक ३०/६/२०२३ |

## २. भरतीकरीता उपलब्ध पदे व वेतनश्रेणी :-

| अ.क्र. | पदनाम | वेतनश्रेणी | भरतीकरिता एकूण उपलब्ध पदे |
|---|---|---|---|
| १ | लघुलेखक (उच्चश्रेणी) (गट-ब) (अराजपत्रित) | S-१६: रु.४४९००-१४२४०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय इतर भत्ते (सातव्या वेतन आयोगानुसार) | १३ |
| २ | लघुलेखक (निम्नश्रेणी) (गट ब) (अराजपत्रित) | S-१५: रु.४१८००-१३२३०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय इतर भत्ते (सातव्या वेतन आयोगानुसार) | २३ |
| ३ | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) (गट ब) (अराजपत्रित) | S-१४: रु.३८६००-१२२८०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय इतर भत्ते (सातव्या वेतन आयोगानुसार) | ८ |
| ४ | वरिष्ठ सांख्यिकी सहाय्यक (गट क) | S-१४: रु.३८६००-१२२८०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय इतर भत्ते (सातव्या वेतन आयोगानुसार) | ५ |
| ५ | कनिष्ठ सांख्यिकी सहाय्यक (गट क) | S-८: रु.२५५००-८११०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय इतर भत्ते (सातव्या वेतन आयोगानुसार) | १५ |

वरील पदांचा सामाजिक व समांतर आरक्षणनिहाय तपशील खालीलप्रमाणे आहे.

### २.१ लघुलेखक (उच्चश्रेणी) (गट ब) (अराजपत्रित)

| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | विजा-(अ) | भ.ज.-(ब) | भ.ज.-(क) | भ.ज.-(ड) | इ.मा.व | वि.मा.प्र. | आ.दु.घ. | अराखीव पदे | एकुण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एकूण पदसंख्या | **२** | **१** | **१** | **१** | **१** | - | **१** | - | **१** | **५** | **१३** |
| रिक्त जागांचे प्रवर्ग निहाय सामाजिक / समांतर आरक्षण विवरण खालील प्रमाणे आहे. | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | १ | १ | १ | १ | १ | - | १ | - | १ | ३ | १० |
| महिला | १ | - | - | - | - | - | - | - | - | २ | ३ |
| खेळाडू | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| दिव्यांग | **एकूण १ पद :- अंध / अल्पदृष्टी** (Blind / Low Vision) | | | | | | | | | | |
| अनाथ | - | | | | | | | | | | |

## २.२ लघुलेखक (निम्नश्रेणी) (गट ब) (अराजपत्रित)

| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | विजा-(अ) | भ.ज.-(ब) | भ.ज.-(क) | भ.ज.-(ड) | इ.मा.व | वि.मा.प्र. | आ.दु.घ. | अराखीव पदे | एकुणपदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एकूण पदसंख्या | **३** | **१** | **१** | **१** | **१** | **१** | **४** | - | **२** | **९** | **२३** |
| रिक्त जागांचे प्रवर्ग निहाय सामाजिक / समांतर आरक्षण विवरण खालील प्रमाणे आहे. | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | २ | १ | १ | १ | १ | १ | ३ | - | १ | ६ | १७ |
| महिला | १ | - | - | - | - | - | १ | - | १ | ३ | ६ |
| खेळाडू | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| दिव्यांग | **एकूण १ पद :- अंध / अल्पदृष्टी** (Blind / Low Vision) | | | | | | | | | | |
| अनाथ | - | | | | | | | | | | |

## २.३ कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) (गट ब) (अराजपत्रित)

| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | विजा-(अ) | भ.ज.-(ब) | भ.ज.-(क) | भ.ज.-(ड) | इ.मा.व | वि.मा.प्र. | आ.दु.घ. | अराखीव पदे | एकुणपदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एकूण पदसंख्या | **१** | **१** | - | - | - | - | **२** | - | **१** | **३** | ८ |
| रिक्त जागांचे प्रवर्ग निहाय सामाजिक / समांतर आरक्षण विवरण खालील प्रमाणे आहे. | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | १ | १ | - | - | - | - | १ | - | १ | २ | ६ |
| महिला | - | - | - | - | - | - | १ | - | - | १ | २ |
| खेळाडू | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| दिव्यांग | - | | | | | | | | | | |
| अनाथ | - | | | | | | | | | | |

## २.४ वरिष्ठ सांख्यिकी सहाय्यक (गट क)

| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | विजा-(अ) | भ.ज.-(ब) | भ.ज.-(क) | भ.ज.-(ड) | इ.मा.व | वि.मा.प्र. | आ.दु.घ. | अराखीव पदे | एकुण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एकूण पदसंख्या | १ | - | १ | - | - | - | १ | - | - | २ | ५ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/ समांतर आरक्षण विवरण खालीलप्रमाणे आहे. | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | १ | - | १ | - | - | - | १ | - | - | १ | ४ |
| महिला | - | - | - | - | - | - | - | - | - | १ | १ |
| खेळाडू | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| माजी सैनिक | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| पदवीधर अंशकालीन कर्मचारी | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| भूकंपग्रस्त | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| प्रकल्पग्रस्त | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| रोजंदारी मजूर | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| दिव्यांग | -- | | | | | | | | | | |
| अनाथ | -- | | | | | | | | | | |

## २.५ कनिष्ठ सांख्यिकी सहाय्यक (गट क)

| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | विजा-(अ) | भ.ज.-(ब) | भ.ज.-(क) | भ.ज.-(ड) | इ.मा.व | वि.मा.प्र. | आ.दु.घ. | अराखीव पदे | एकुण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एकूण पदसंख्या | १ | १ | १ | १ | १ | - | २ | - | २ | ६ | **१५** |
| रिक्त जागांचे प्रवर्ग निहाय सामाजिक/समांतर आरक्षण विवरण खालील प्रमाणे आहे. | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | १ | १ | १ | १ | १ | - | १ | - | १ | १ | ८ |
| महिला | - | - | - | - | - | - | १ | - | १ | २ | ४ |
| खेळाडू | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| माजी सैनिक | - | - | - | - | - | - | - | - | - | १ | १ |
| पदवीधर अंशकालीन कर्मचारी | - | - | - | - | - | - | - | - | - | १ | १ |
| भूकंपग्रस्त | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| प्रकल्पग्रस्त | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| रोजंदारी मजूर | - | - | - | - | - | - | - | - | - | १ | १ |
| दिव्यांग | **एकूण १ पद :- अंध / अल्पदृष्टी** (Blind / Low Vision) | | | | | | | | | | |
| अनाथ | -- | | | | | | | | | | |

## ३. **शैक्षणिक पात्रता** :-

### ३.१ **लघुलेखक** (**उच्चश्रेणी**) (**गट ब**) (**अराजपत्रित**) :-

**३.१.१** उमेदवाराने माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

**३.१.२** उमेदवाराने लघुलेखनाचा वेग किमान १२० शब्द प्रति मिनिट अशी अर्हता असल्याबाबतचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक आहे.

**३.१.३** उमेदवाराने इंग्रजी टंकलेखनाचा वेग किमान ४० शब्द प्रति मिनिट किंवा मराठी टंकलेखनाचा वेग किमान ३० शब्द प्रति मिनिट या अर्हतेचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक आहे.

**३.१.४** अर्ज स्वीकारणाच्या अंतिम दिनांकास सदर अर्हता धारण करणे आवश्यक आहे.

**३.१.५** मराठी भाषेचे ज्ञान (लिहीणे, वाचणे व बोलणे) आवश्यक आहे.

### ३.२ **लघुलेखक** (**निम्नश्रेणी**) (**गट ब**) (**अराजपत्रित**) :-

**३.२.१** उमेदवाराने माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

**३.२.२** उमेदवाराने लघुलेखनाचा वेग किमान १०० शब्द प्रति मिनिट अशी अर्हता असल्याबाबतचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक आहे.

**३.२.३** उमेदवाराने इंग्रजी टंकलेखनाचा वेग किमान ४० शब्द प्रति मिनिट किंवा मराठी टंकलेखनाचा वेग किमान ३० शब्द प्रति मिनिट या अर्हतेचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक आहे.

**३.२.३** अर्ज स्वीकारणाच्या अंतिम दिनांकास सदर अर्हता धारण करणे आवश्यक आहे.

**३.२.४** मराठी भाषेचे ज्ञान (लिहीणे, वाचणे व बोलणे) आवश्यक आहे.

३.३ **कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) (गट ब) (अराजपत्रित)** :-

**३.३.१** उमेदवाराने शासनाने मान्यता दिलेली तीन वर्ष कालावधीची स्थापत्य अभियंत्रिकी मधील पदविका किंवा तिच्याशी समतुल्य म्हणून मान्यता मिळालेली अशी इतर कोणतीही अर्हता धारण करणे आवश्यक आहे.

**३.३.२** अर्ज स्वीकारणाच्या अंतिम दिनांकास सदर अर्हता धारण करणे आवश्यक आहे.

**३.३.३** मराठी भाषेचे ज्ञान (लिहीणे, वाचणे व बोलणे) आवश्यक आहे.

३.४ **वरिष्ठ सांख्यिकी सहाय्यक (गट क)** :-

**३.४.१** उमेदवाराने मान्यता प्राप्त विद्यापीठाची गणित, अर्थशास्त्र, वाणिज्य, कृषी किंवा सांख्यिकी या विषयात पदव्युत्तर पदवी

**किंवा**

मान्यता प्राप्त विद्यापीठाची गणित, अर्थशास्त्र, वाणिज्य, कृषी किंवा सांख्यिकी या विषयातील किमान द्वितीय श्रेणीतील पदवी धारण करणे आवश्यक आहे.

**३.४.२** अर्ज स्वीकारणाच्या अंतिम दिनांकास सदर अर्हता धारण करणे आवश्यक आहे.

**३.४.३** मराठी भाषेचे ज्ञान (लिहीणे, वाचणे व बोलणे) आवश्यक आहे.

३.५ **कनिष्ठ सांख्यिकी सहाय्यक (गट क)** :-

**३.५.१** उमेदवाराने मान्यता प्राप्त विद्यापीठाची गणित, अर्थशास्त्र, वाणिज्य, कृषी किंवा सांख्यिकी या विषयात पदवी धारण करणे आवश्यक आहे.

**३.५.२** अर्ज स्वीकारणाच्या अंतिम दिनांकास सदर अर्हता धारण करणे आवश्यक आहे.

**३.५.३** मराठी भाषेचे ज्ञान (लिहीणे, वाचणे व बोलणे) आवश्यक आहे.

४. **वयोमर्यादा** :-

४.१ **वयोमर्यादा गणण्याचा दिनांक**:- अर्ज स्वीकारणाचा अंतिम दिनांक

४.२ लघुलेखक (उच्चश्रेणी) (गट ब) (अराजपत्रित), लघुलेखक (निम्नश्रेणी) (गट ब) (अराजपत्रित), कनिष्ठ अभियंता (स्थापत्य)(गट ब) (अराजपत्रित), वरिष्ठ सांख्यिकी सहाय्यक (गट-क) व कनिष्ठ सांख्यिकी सहाय्यक (गट-क) या पदासाठी किमान व कमाल वयोमर्यादा खालीलप्रमाणे राहील.

| अ. क्र. | घटक | | वयोमर्यादा | |
|---|---|---|---|---|
| | | | किमान | कमाल |
| १ | अमागास | | १८ | ४० |
| २ | मागासवर्गीय / अनाथ / आ.दु.घ. | | १८ | ४५ |
| ३ | प्राविण्याप्राप्त खेळाडू | अमागास | १८ | ४५ |
| | | मागासवर्गीय / अनाथ /आ.दु.घ. | १८ | ४५ |
| ४ | माजी सैनिक | अमागास | १८ | ४०+ सैनिकी सेवेचा कालावधी +३ |
| | | मागासवर्गीय / अनाथ /आ.दु.घ. | १८ | ४५+ सैनिकी सेवेचा कालावधी +३ |
| ५ | दिव्यांग | | १८ | ४५ |
| ६ | प्रकल्पग्रस्त | | १८ | ४५ |
| ७ | भूकंपग्रस्त | | १८ | ४५ |
| ८ | पदवीधर अंशकालीन कर्मचारी | | १८ | ५५ |
| ९ | रोजंदारी मजूर | | १८ | ५५ |

५. **परीक्षा शुल्क** :-

**५.१** उमेदवारांना अर्ज भरण्यासाठी खालीलप्रमाणे परीक्षा शुल्क भरणा करावा लागेल.

| प्रवर्ग | शुल्क |
|---|---|
| अमागास | रु.१०००/- |
| मागासवर्गीय / आ.दु.घ/ अनाथ / दिव्यांग | रु.९००/- |
| माजी सैनिक | ० |

**५.२** माजी सैनिक यांना शासन निर्णय क्र. आरटीए-१०७९/०/४८२/XVI-A, दिनांक ३/७/१९८० नुसार परीक्षा शुल्कातून सूट देण्यात येत आहे.

**५.३** उमेदवारास वरील पदांपैकी एकापेक्षा जास्त पदांकरिता अर्ज करावयाचा असल्यास त्याला प्रत्येक पदाकरिता वेगवेगळा अर्ज करावा लागेल. तसेच त्याकरिता वेगवेगळे परीक्षा शुल्क भरणा करावे लागेल.

**५.४** परीक्षा शुल्क ना-परतावा (Non-refundable) आहे.

६. **अर्ज करण्याची पध्दत** :-

६.१ अर्ज फक्त ऑनलाईन पध्दतीने स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. जिल्हा रोजगार कार्यालय, जिल्हा समाज कल्याण कार्यालय,

सैनिक कल्याण कार्यालय इत्यादी कार्यालयांकडे नोंदणीकृत असलेल्या उमेदवारांनी देखील स्वतः ऑनलाईन पद्धतीने अर्ज करणे आवश्यक आहे.

६.२ उमेदवाराला www.mahaforest.gov.in या संकेतस्थळावर जाऊन भरती प्रक्रिया (Recruitment) या टॅबवर क्लिक करावे. या टॅब मध्ये अर्ज करण्याकरिता लिंक उपलब्ध राहील. तसेच या टॅबवर जाहीरात उपलब्ध आहे. सदर जाहीरातीचे अवलोकन करुनच उमेदवाराने अर्ज करावयाचा आहे.

६.३ भरती प्रक्रिया (Recruitment) या टॅबवर उपलब्ध लिंक वर क्लिक केल्यानंतर Registration (नोंदणी) हा पृष्ठ (Page) सुरु होईल. यामध्ये उमेदवाराने परिपूर्ण माहिती भरावी. एस.एस.सी. रोल नंबर भरताना एस.एस.सी. उत्तीर्ण झाल्याबाबत गुणपत्रिकेतील रोल नंबर नमुद करावा. Registration (नोंदणी) या पृष्ठावरील (Page) माहिती भरुन झाल्यानंतर सदर माहिती बरोबर असल्याची खात्री करावी लागेल. Registration (नोंदणी) झाल्यानंतर यामध्ये बदल करता येणार नाही. Registration (नोंदणी) झाल्यानंतर उमेदवारास Registration Number / Login Id व Password ई-मेलद्वारे व एसएमएस द्वारे उपलब्ध करुन देण्यात येईल. या Login Id व Password द्वारे उमेदवारास लॉग-ईन करता येईल.

६.४ तद्नंतर उमेदवाराने Post Selection या टॅबवर क्लिक करुन Click here to fill the application यावर क्लिक करावे. त्यावर Personal Details चा पेज सुरु होईल. यामध्ये उमेदवाराने आपली माहिती भरावी.

६.५ त्यानंतर उमेदवाराने Additional Details, Communication Details, Qualification and Experience या पेजवरील माहिती भरावी.

६.६ Documents / Image Upload या पेजवर photograph upload करताना passport size and colored with white background असलेली फोटो अपलोड करावी. Photo चा size 50kb ते 80 kb असावा. इमेज .jpg किंवा .jpeg या फॉर्मेटमध्ये असावी. Scanner dpi 200 dpi असावे. फोटोचे Dimesion हे ३.५ cm * ४.५ cm असावे.

६.७ Documents / Image Upload या पेजवर Signature upload करताना त्याचा size 50kb ते 80 kb असावा. इमेज .jpg किंवा .jpeg या फॉर्मेटमध्ये असावी.

६.८ Documents / Image Upload या पेजवर इतर Documents upload करताना त्याचा size 100 kb ते 300 kb असावा. सदर Document .jpg किंवा .jpeg किंवा pdf या फॉर्मेटमध्ये असावी.

६.९ पेमेंट करताना फक्त ऑनलाईन पध्दतीने करता येईल.

७. **निवडीची पध्दत** :- ऑनलाईन पध्दतीने केलेल्या अर्जातील माहितीनुसार पात्र ठरणा-या उमेदवारांची महसूल व वनविभाग, शासन निर्णय क्रमांक एफएसटी-०६/२२/प्र.क्र.१२८/फ-४, दिनांक २७/१२/२०२२ व शासनाच्या अनुषंगिक दिशानिर्देशानुसार निवड करण्यात येईल. निवडीबाबत टप्पे यासोबत **परिशिष्ट-१** म्हणून जोडले आहे.

## ७.१ लघुलेखक (उच्चश्रेणी) (गट ब) (अराजपत्रित), लघुलेखक (निम्नश्रेणी) (गट ब) (अराजपत्रित) :-

### ७.१.१ ऑनलाईन परीक्षा :-

(अ) ऑनलाईन अर्जातील माहितीनुसार पात्र ठरलेल्या उमेदवारांची, १२० गुणांची (एकूण ६० प्रश्न, प्रत्येक प्रश्नाला २ गुण) स्पर्धात्मक ऑनलाईन परीक्षा टि.सी.एस. आयओएन (टाटा कन्सल्टन्सी सव्हिर्सेस लिमिटेड) यांचेमार्फत घेण्यात येईल. ऑनलाईन परीक्षेमध्ये खालीलप्रमाणे ४ विषयांना गुण देण्यात येतील.

| अ.क्र. | विषय | गुण |
|---|---|---|
| १ | मराठी | ३० |
| २ | इंग्रजी | ३० |
| ३ | सामान्य ज्ञान | ३० |
| ४ | बौध्दिक चाचणी | ३० |

(ब) ऑनलाईन परीक्षेतील प्रश्नांचा स्तर हा माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (१० वी) परीक्षेच्या दर्जाच्या समान राहील.

(क) परीक्षा ही ऑनलाईन पध्दतीने (Computer based test) वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपात आयोजित करण्यात येईल.

(ड) परीक्षा ही २ तासाची राहील.

(इ) उमेदवाराने ऑनलाईन परीक्षेत किमान ४५% गुण प्राप्त करणे आवश्यक राहील. ४५% किंवा त्यापेक्षा अधिक गुण मिळविणारे उमेदवार पुढील टप्प्याकरिता पात्र राहतील. ४५% पेक्षा कमी गुण मिळविणारे उमेदवार भरती प्रक्रियेतून बाद होतील.

**७.१.२ ऑनलाईन परीक्षेचा निकाल** :- ऑनलाईन परीक्षेचा निकाल वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येईल.

**७.१.३ कागदपत्र तपासणी** :- ऑनलाईन परीक्षेत किमान ४५% गुण प्राप्त करणा-या उमेदवारांची राज्यस्तरीय निवड समितीच्या सूचनेनुसार कागदपत्रांची तपासणी करण्यात येईल. कागदपत्र तपासणीच्या वेळेस उमेदवारांना लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक राहील (सोबत जोडलेल्या **परिशिष्ट-२** प्रमाणे). जे उमेदवार आवश्यक कागदपत्रे सादर करणार नाहीत किंवा गैरहजर राहतील ते उमेदवार भरती प्रक्रियेतून बाद ठरतील.

**७.१.४ व्यावसायिक चाचणी** :- ऑनलाईन परीक्षेत किमान ४५% गुण प्राप्त केले आहेत अशा पात्र उमेदवारांना राज्यस्तरीय निवड समिती कडून ठरविलेल्या तारखेनुसार ८० गुणांची व्यावसायिक चाचणी घेण्यात येईल. व्यावसायिक चाचणीची तारीख जाहीर करण्यात येईल.

**७.१.५ निवड यादी व प्रतिक्षा यादी जाहीर करणे** :- ऑनलाईन परीक्षा व व्यावसायिक चाचणी यामधील गुण एकत्रित करून गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल व त्या आधारे सामाजिक / समांतर आरक्षण विचारात घेऊन रिक्त पदांच्या अनुषंगाने वनवृत्तवार निवड यादी व प्रतिक्षा यादी तयार करण्यात येऊन ती वेबसाईटवर वर प्रसिध्द करण्यात येईल. निवड यादी व प्रतिक्षा यादी सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक प्रानिमं १२२२/प्र.क्र.५४/का.१३-अ, दिनांक ४/५/२०२२ मधील परिच्छेद १० मधील तरतुदीनुसार तयार करण्यात येईल.

**७.२ कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) (गट ब) (अराजपत्रित)** :-

**७.२.१ ऑनलाईन परीक्षा** :-

(**अ**) ऑनलाईन अर्जातील माहितीनुसार पात्र ठरलेल्या उमेदवारांची, २०० गुणांची (एकूण १०० प्रश्न, प्रत्येक प्रश्नाला २ गुण) स्पर्धात्मक ऑनलाईन परीक्षा टि.सी.एस. आयओएन (टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस लिमिटेड) यांचेमार्फत घेण्यात येईल. ऑनलाईन परीक्षेमध्ये खालीलप्रमाणे ४ विषयांना गुण देण्यात येईल.

| अ.क्र. | विषय | गुण |
|---|---|---|
| १ | मराठी | ३० |
| २ | इंग्रजी | ३० |
| ३ | सामान्य ज्ञान | ३० |
| ४ | बौध्दिक चाचणी | ३० |
| ५ | पदविका दर्जाचे स्थापत्य अभियांत्रिकी | ८० |

(**ब**) ऑनलाईन परीक्षेतील प्रश्नांचा स्तर हा तीन वर्ष कालावधीच्या स्थापत्य अभियंत्रिकी मधील पदविका परीक्षेच्या दर्जाच्या समान राहील, परंतू वरील मराठी व इंग्रजी या विषयांच्या प्रश्नपत्रिकेचा दर्जा उच्च माध्यमिक परीक्षेच्या (इयत्ता १२ वी) दर्जाच्या समान राहील.

(**क**) परीक्षा ही ऑनलाईन पध्दतीने (Computer based test) वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपात आयोजित करण्यात येईल.

(**ड**) परीक्षा ही २ तासाची राहील.

(**इ**) उमेदवाराने ऑनलाईन परीक्षेत किमान ४५% गुण प्राप्त करणे आवश्यक राहील. ४५% किंवा त्यापेक्षा अधिक गुण मिळविणारे उमेदवारांपैकी गुणवत्तेनुसार शिफारस करण्यात येईल. ४५% पेक्षा कमी गुण मिळविणारे उमेदवार भरती प्रक्रियेतून बाद होतील.

**७.२.२ ऑनलाईन परीक्षेचा निकाल** :- ऑनलाईन परीक्षेचा वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येईल.

**७.२.३ कागदपत्र तपासणी** :- ऑनलाईन परीक्षेत किमान ४५% गुण प्राप्त करणा-या उमेदवारांची राज्यस्तरीय निवड समितीच्या सूचनेनुसार कागदपत्राची तपासणी करण्यात येईल. कागदपत्रे तपासणीच्या वेळेस उमेदवारांना लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक राहील (सोबत जोडलेल्या **परिशिष्ट-२** प्रमाणे). जे उमेदवार आवश्यक कागदपत्रे सादर करणार नाहीत किंवा गैरहजर राहतील ते उमेदवार भरती प्रक्रियेतून बाद ठरतील.

**७.२.४ निवडयादी व प्रतिक्षायादी जाहीर करणे** :- ऑनलाईन परीक्षेत प्राप्त गुणांच्या आधारे गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल व त्या आधारे सामाजिक / समांतर आरक्षण विचारात घेऊन रिक्त पदांच्या अनुषंगाने राज्यस्तरीय निवड समिती निवड यादी व प्रतिक्षा यादी तयार करण्यात येऊन ती वेबसाईटवर वर प्रसिध्द करण्यात येईल. निवड यादी व प्रतिक्षायादी सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक प्रानिमं १२२२/प्र.क्र.५४/का.१३-अ, दिनांक ४/५/२०२२ मधील परिच्छेद १० मधील तरतुदीनुसार तयार करण्यात येईल.

**७.३ वरिष्ठ सांख्यिकी सहाय्यक (गट-क) व कनिष्ठ सांख्यिकी सहाय्यक (गट-क)** :-

**७.३.१ ऑनलाईन परीक्षा** :-

(**अ**) ऑनलाईन अर्जातील माहितीनुसार पात्र ठरलेल्या उमेदवारांची, २०० गुणांची (एकूण १०० प्रश्न, प्रत्येक प्रश्नाला २ गुण) स्पर्धात्मक ऑनलाईन परीक्षा टि.सी.एस. आयओएन (टाटा कन्सल्टन्सी सव्हिर्सेस लिमिटेड) यांचेमार्फत घेण्यात येईल. ऑनलाईन परीक्षेमध्ये खालीलप्रमाणे ४ विषयांना गुण देण्यात येईल.

| अ.क्र. | विषय | गुण |
|---|---|---|
| १ | मराठी | ३० |
| २ | इंग्रजी | ३० |
| ३ | सामान्य ज्ञान | ३० |
| ४ | बौध्दिक चाचणी | ३० |
| ५ | सांख्यिकी | ८० |

(**ब**) ऑनलाईन परीक्षेतील प्रश्नांचा स्तर हा भारतातील मान्यताप्राप्त विद्यापीठांच्या पदवी परीक्षेच्या दर्जाच्या समान राहील, परंतु वरील मराठी व इंग्रजी या विषयांच्या प्रश्नपत्रिकेचा दर्जा उच्च माध्यमिक परीक्षेच्या (इयत्ता १२ वी) दर्जाच्या समान राहील.

(**क**) परीक्षा ही ऑनलाईन पध्दतीने (Computer based test) वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपात आयोजित करण्यात येईल.

(**ड**) परीक्षा ही २ तासाची राहील.

(**इ**) उमेदवाराने ऑनलाईन परीक्षेत किमान ४५% गुण प्राप्त करणे आवश्यक राहील. ४५% किंवा त्यापेक्षा अधिक गुण मिळविणा-या उमेदवारांपैकी गुणवत्तेनुसार शिफारस करण्यात येईल. ४५% पेक्षा कमी गुण मिळविणारे उमेदवार भरती प्रक्रियेतून बाद होतील.

**७.३.२ ऑनलाईन परीक्षेचा निकाल** :- ऑनलाईन परीक्षेचा निकाल वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येईल.

**७.३.३ कागदपत्र तपासणी** :- ऑनलाईन परीक्षेत किमान ४५% गुण प्राप्त करणा-या उमेदवारांची राज्यस्तरीय निवड समितीच्या सूचनेनुसार कागदपत्राची तपासणी करण्यात येईल. कागदपत्र तपासणीच्या वेळेस उमेदवारांना लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक राहील (सोबत जोडलेल्या **परिशिष्ट-२** प्रमाणे). जे उमेदवार आवश्यक कागदपत्रे सादर करणार नाहीत किंवा गैरहजर राहतील ते उमेदवार भरती प्रक्रियेतून बाद ठरतील.

**७.३.४ निवडयादी व प्रतिक्षायादी जाहीर करणे** :- ऑनलाईन परीक्षेत प्राप्त गुणांच्या आधारे गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल व त्या आधारे सामाजिक / समांतर आरक्षण विचारात घेऊन रिक्त पदांच्या अनुषंगाने राज्यस्तरीय निवड समिती निवड यादी व प्रतिक्षा यादी तयार करण्यात

येऊन ती वेबसाईटवर वर प्रसिध्द करण्यात येईल. निवड यादी व प्रतिक्षायादी सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक प्रानिमं १२२२/प्र.क्र.५४/का.१३-अ, दिनांक ४/५/२०२२ मधील परिच्छेद १० मधील तरतुदीनुसार तयार करण्यात येईल.

७.४ **निवड यादीची कालमर्यादा** :-

**७.४.१** राज्यस्तरीय निवड समितीने तयार केलेली निवडसूची १ वर्षासाठी किंवा निवडसूची तयार ज्या दिनांकापर्यंत रिक्त पदे विचारात घेण्यात आली आहेत त्या दिनांकापर्यंत, त्यापैकी जे नंतर घडेल त्या दिनांकापर्यंत विधीग्राह्य राहील. त्यानंतर ही निवडसूची व्यपगत होईल.

**७.४.२** राज्यस्तरीय निवड समितीने तयार केलेल्या निवडसूचीमधून ज्येष्ठतेनुसार उमेदवारांची नियुक्तीसाठी शिफारस केल्यानंतर शिफारस केलेला उमेदवार सदर पदावर विहीत मुदतीत रुजू न झाल्यास किंवा संबंधित पदाच्या सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनुसार, किंवा जात प्रमाणपत्र / अन्य आवश्यक प्रमाणपत्राची अनुपलब्धता / अवैधता किंवा अन्य कोणत्याही कारणास्तव नियुक्तीसाठी पात्र ठरत नसल्याचे आढळून आल्यास अथवा शिफारस केलेला उमेदवार रुजू झाल्यानंतर नजिकच्या कालावधीत त्याने राजीनामा दिल्यामुळे किंवा त्याचा मृत्यू झाल्याने पद रिक्त झाल्यास, अशी पदे त्या त्या प्रवर्गाच्या निवडसूचीतील अतिरिक्त उमेदवारांमधून (प्रतिक्षा यादीतील) वरिष्ठतेनुसार उतरत्या क्रमाने भरण्यात येतील. मात्र, अशी कार्यवाही निवडसूचीच्या कालमर्यादेत करण्यात येईल.

८. **पदसंख्या व आरक्षणासंदर्भात सर्वसाधारण तरतूदी :-**

८.१ सदर जाहीरात प्रसिध्द झाल्यानंतर पदसंख्येमध्ये बदल होण्याची शक्यता आहे. त्याचप्रमाणे जाहीरात प्रसिध्द झाल्यानंतर आरक्षण संबंधी शासन धोरणात बदल झाल्यास तो त्याप्रमाणे लागू राहील. याबाबत अद्ययावत सूचना संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येतील.

८.२ प्रस्तुत जाहीरातीमध्ये नमूद संवर्गामध्ये काही मागास प्रवर्ग व समांतर आरक्षणाची पदे उपलब्ध नाहीत. तथापि, जाहीरात प्रसिध्द झाल्यानंतर मागास प्रवर्ग तसेच समांतर आरक्षणाकरिता पदे उपलब्ध होण्याची व विद्यमान पदसंख्येमध्ये बदल / वाढ होण्याची शक्यता आहे. या जाहीरातीमध्ये पदे आरक्षित नसल्यामुळे अथवा पदसंख्या कमी असल्यामुळे अर्ज सादर केला नसल्याची व त्यामुळे निवडीची संधी वाया गेल्याबाबतची तक्रार नंतर कोणत्याही टप्प्यावर विचारात घेतली जाणार नाही.

८.३ महिलांसाठी आरक्षित पदांकरिता दावा करणा-या उमेदवारांनी महिला आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा असल्यास त्यांनी अर्जामध्ये न चुकता महाराष्ट्राचे अधिवासी (Domicile) असल्याबाबत नमूद करणे आवश्यक आहे. खुल्या प्रवर्गातील महिलांकरिता आरक्षित असलेल्या पदावर निवडीकरिता खुल्या प्रवर्गातील महिला तसेच सर्व मागास प्रवर्गातील महिलांनी नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करण्याची अट शासन, महिला व बाल विकास विभाग निर्णय क्र. महिआ-२०२३/प्र.क्र.१२३/कार्या-२, दिनांक ४ मे २०२३ अन्वये रद्द केली आहे. तथापि अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळता अन्य मागास प्रवर्गातील महिलांकरिता आरक्षित असलेल्या पदावरील निवडीसाठी दावा करुन इच्छिणा-या महिलांना त्या-त्या मागास प्रवर्गासाठी इतर मागास व बहुजन कल्याण विभाग तसेच सामान्य प्रशासन विभागाकडून वेळोवेळी विहीत करण्यात आल्याप्रमाणे नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्र सादर करण्याबाबतच्या तरतुदी लागू राहतील.

८.४ वि.जा.-(अ), भ.ज.-(ब), भ.ज.-(क) व भ.ज.-(ड) प्रवर्गासाठी आरक्षित असलेली पदे आंतर परिवर्तनीय असून आरक्षित पदासाठी संबंधित वर्गवारीतील योग्य व पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास प्रचलित शासन धोरणाप्रमाणे उपलब्ध प्रवर्गातील उमेदवाराचा विचार गुणवत्तेच्या आधारावर करण्यात येईल.

८.५ एखादी जात / जमात राज्य शासनाकडून आरक्षणासाठी पात्र असल्याचे घोषित केली असल्यासच तसेच सक्षम प्राधिका-याने प्रदान केलेले प्रमाणपत्र उमेदवाराकडे अर्ज करतानाच उपलब्ध असेल तर संबंधित जात / जमातीचे उमेदवार आरक्षणाच्या दाव्यासाठी पात्र असतील.

८.६ समांतर आरक्षणाबाबत शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक एसआरव्ही-१०१२/ प्र.क्र.१६/१२/१६-अ, दिनांक १३ ऑगस्ट, २०१४ व शासन शुध्दीपत्रक, सामान्य प्रशासन विभाग दिनांक १९ डिसेंबर २०१८ आणि तद्नंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

८.७ आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील (ईडब्ल्यूएस) उमेदवारांकरिता शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. राआधो-४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दिनांक १२ फेब्रुवारी २०१९ व दिनांक ३१ मे २०२१ अन्वये विहीत करण्यात आलेले प्रमाणपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

८.८ शासन परिपत्रक, सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग क्र. सीबीसी-२०१२/प्र.क्र.१८२ /विजाभज-१, दिनांक २५ मार्च २०१३ अन्वये विहीत कार्यपध्दतीनुसार संबंधीत जाहीरातीमध्ये नमूद अर्ज स्वीकारण्याचा अंतिम दिनांक संबंधित उमेदवार उन्नत आणि प्रगत व्यक्ती / गटामध्ये मोडत नसल्याबाबतची पडताळणी करण्यासाठी गृहित धरण्यात येईल.

८.९ शासन परिपत्रक, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र. सीबीसी-२०१३/प्र.क्र.१८२ /विजाभज-१, दिनांक १७ ऑगस्ट २०१३ अन्वये जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार उन्नत आणि प्रगत व्यक्ती / गट यामध्ये मोडत नसल्याचे नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्राच्या वैधतेचा कालावधी विचारात घेण्यात येईल.

८.१० सेवा प्रवेशाच्या प्रयोजनासाठी शासनाने मागास म्हणून मान्यता दिलेल्या समाजाच्या वयोमर्यादेमध्ये सवलत घेतलेल्या उमेदवारांचा अराखीव (खुला) पदावरील निवडीकरिता विचार करण्याबाबत शासनाच्या धोरणानुसार कार्यवाही करण्यात येईल. अराखीव (खुला) उमेदवारांकरिता विहित केलेल्या वयोमर्यादा तसेच इतर पात्रता विषयक निकषा संदर्भातील अटींची पुर्तता करणा-या सर्व उमेदवारांचा (मागासवर्गीय उमेदवारांसह) अराखीव (खुला) सर्वसाधारण पदावरील शिफारशीकरिता विचार होत असल्याने, सर्व आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांनी त्यांच्या प्रवर्गासाठी पद आरक्षित / उपलब्ध नसले तरी, अर्जामध्ये त्यांच्या मूळ प्रवर्गासंदर्भातील माहिती अचूकपणे नमूद करणे बंधनकारक आहे.

८.११ कोणत्याही प्रकारच्या आरक्षणाचा लाभ हा केवळ महाराष्ट्राचे सर्वसाधारण रहिवासी असणा-या उमेदवारांना अनुज्ञेय आहे. सर्वसाधारण रहिवासी या संज्ञेला भारतीय लोकप्रतिनिधीत्व कायदा १९५० च्या कलम २० अनुसार जो अर्थ आहे तोच अर्थ असेल. महाराष्ट्राशिवाय इतर राज्यातील उमेदवार तसेच महाराष्ट्र-कर्नाटक विवादित सीमा भागातील उमेदवार केवळ "अराखीव-सर्वसाधारण" पदांवरील नेमणुकीसांठी पात्र असतील.

८.१२ कोणत्या प्रकारच्या आरक्षणाचा (सामाजिक व समांतर) अथवा सोयी सवलतींचा दावा करणा-या उमेदवाराकडे संबंधित कायदा / नियम / आदेशानुसार विहीत नमुन्यातील प्रस्तुत जाहिरातीस अनुसरुन अर्ज स्वीकारण्यासाठी विहीत केलेल्या दिनांकापूर्वीचे वैध प्रमाणपत्र उपलब्ध असणे अनिवार्य आहे.

८.१३ सामाजिक व समांतर आरक्षणासंदर्भात विविध न्यायालयामध्ये दाखल न्यायप्रविष्ट प्रकरणी अंतिम निर्णयाच्या अधीन राहून पदभरतीची कार्यवाही करण्यात येईल.

**८.१४ खेळाडू आरक्षण :-**

८.१४.१ शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १ जुलै २०१६ तसेच शासन शुध्दीपत्रक क्रमांक राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १८ ऑगस्ट, २०१६, शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र. संकीर्ण-१७१६/प्र.क्र.१८/क्रीयुसे-२, दिनांक ३० जून २०२२ आणि तदनंतर शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार प्राविण्य प्राप्त खेळाडू आरक्षणासंदर्भात तसेच वयोमर्यादेतील सवलतीसंदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

८.१४.२ प्राविण्य प्राप्त खेळाडू व्यक्तींसाठी असलेल्या आरक्षणाचा दावा करणा-या उमेदवारांच्या बाबतीत क्रीडाविषयक विहीत अर्हता धारण करीत असल्याबाबत सक्षम प्राधिका-याने प्रमाणित केलेले पात्र खेळाचे प्राविण्य प्रमाणपत्र अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकाचे किंवा तत्पूर्वीचे असणे बंधनकारक आहे.

८.१४.३ खेळाचे प्राविण्य प्रमाणपत्र योग्य दर्जाचे असल्याबाबत तसेच तो खेळाडू उमेदवार खेळाडूसाठी आरक्षित पदावरील निवडीकरिता पात्र ठरतो, याविषयीच्या पडताळणीकरिता त्यांचे प्राविण्य प्रमाणपत्र संबंधित विभागीय उपसंचालक कार्यालयाकडे अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वीच सादर केलेले असणे बंधनकारक आहे. अन्यथा प्राविण्या प्राप्त खेळाडू आरक्षणाकरिता पात्र समजण्यात येणार नाही.

८.१४.४ एकापेक्षा जास्त खेळांचे प्राविण्य असणा-या खेळाडू उमेदवाराने एकाच वेळेस सर्व खेळांची प्राविण्य प्रमाणपत्रे प्रमाणित करण्याकरिता संबंधित उपसंचालक कार्यालयाकडे सादर करणे बंधनकारक आहे.

**८.१५ दिव्यांग आरक्षण** :-

८.१५.१ दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ च्या आधारे शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक दिव्यांग २०१८/प्र.क्र.११४/१६-अ, दिनांक २९ मे २०१९ तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार दिव्यांग व्यक्तींच्या आरक्षणासंदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

८.१५.२ जाहीरातीतील पदाकरीता दिव्यांग सुनिश्चिती संदर्भातील तपशील खालीलप्रमाणे आहे.

| पदनाम | शासन निर्णय | शारीरिक पात्रता | दिव्यांग प्रवर्ग |
|---|---|---|---|
| लघुलेखक (उच्चश्रेणी) | शासन निर्णय, महसूल व वनविभाग क्र. एफएसटी-०६/२१/प्र.क्र.१६५/फ-४, दि. १९/७/२०२१ | S, ST, W, MF, SE, H | a) B, LV<br>b) OA, OL, BL, CP, LC, Dw, AAV, MDy<br>c) ASD (M), SLD, MI<br>d) MD involving (a) to (c) above |
| लघुलेखक (निम्नश्रेणी) | शासन निर्णय, महसूल व वनविभाग क्र. एफएसटी-०६/२१/प्र.क्र.१६५/फ-४, दि. १९/७/२०२१ | S, ST, W, MF, SE, H | a) B, LV<br>b) OA, OL, BL, CP, LC, Dw, AAV, MDy<br>c) ASD (M), SLD, MI<br>d) MD involving (a) to (c) above |
| कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | शासन निर्णय, महसूल व वनविभाग क्र. एफएसटी-०६/२१/ प्र.क्र.१६५/फ-४, दि. १९/७/२०२१ | S, ST, BN, KC, MF, RW, SE, H, C | a) D, HH<br>b) OA, OL, LC, Dw, AAV<br>c) SLD, MI<br>d) MD involving (a) to (c) above |
| वरिष्ठ सांख्यिकी सहाय्यक | शासन निर्णय, महसूल व वनविभाग क्र. एफएसटी-०६/२१/प्र.क्र.१६५/फ-४, दि. १९/७/२०२१ | S, ST, W, BN, MF, RW, SE, H, C | a) B, LV<br>b) D, HH<br>c) OA, BA, OL, OAL, BLA, BLOA, CP, LC, Dw, AAV, MDy<br>d) ASD (M), ID, SLD, MI<br>e) MD involving (a) to (d) above |
| कनिष्ठ सांख्यिकी सहाय्यक | शासन निर्णय, महसूल व वनविभाग क्र. एफएसटी-०६/२१/प्र.क्र.१६५/फ-४, दि. १९/७/२०२१ | S, ST, W, BN, MF, SE, H | a) LV<br>b) D, HH<br>c) OA, BA, OL, BL, CP, LC, Dw, AAV<br>d) ASD (M), MI<br>e) MD Involving (a) to (d) above |

वरील abbreviation चा पूर्ण अर्थ उक्त शासन निर्णयात नमूद आहे.

८.१५.३ दिव्यांग व्यक्तीसाठी असलेली पदे भरावयाच्या एकूण पदसंख्येपैकी असतील.

८.१५.४ दिव्यांग व्यक्तींची संबंधित संवर्ग / पदाकरिता पात्रता शासनाकडून वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

८.१५.५ दिव्यांग व्यक्तीसाठी आरक्षित पदावर शिफारस करताना उमेदवार कोणत्या सामाजिक प्रवर्गातील आहे, याचा विचार न करता दिव्यांग गुणवत्ता क्रमांकानुसार त्यांची शिफारस करण्यात येईल.

८.१५.६ संबंधित दिव्यांगत्वाच्या प्रकाराचे किमान ४०% दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र धारक उमेदवार / व्यक्ती आरक्षण तसेच नियमानुसार अनुज्ञेय सोयी / सवलतीसाठी पात्र असतील.

८.१६ **अनाथ आरक्षण** :-

८.१६.१ अनाथ व्यक्तीचे आरक्षण शासन निर्णय, महिला व बालविकास विभाग, क्रमांक अनाथ-२०२२/प्र.क्र.१२२/का.०३, दिनांक ६ एप्रिल, २०२३, शासन पूरकपत्र क्र. अनाथ-२०२२/प्र.क्र.१२२/का.०३, दिनांक १० मे, २०२३ तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणा-या आदेशानुसार राहील.

८.१६.२ अनाथांसाठी आरक्षित पदावर गुणवत्तेनुसार निवड झालेल्या उमेदवारांचा समावेश उमेदवार ज्या सामाजिक प्रवर्गाचा आहे त्या प्रवर्गातून करण्यात येईल.

८.१७ **माजी सैनिक आरक्षण** :-

८.१७.१ उमेदवार स्वतः माजी सैनिक असल्यास त्याने त्याबाबत स्पष्टपणे दावा करणे आवश्यक आहे. अन्यथा त्यास माजी सैनिकांना अनुज्ञेय असलेले लाभ मिळणार नाहीत.तसेच युद्धात / सैन्यदलातील सेवेत मृत्यू पावलेल्या किंवा झालेल्या सैनिकांच्या कुटुंबियास शासकीय सेवेत फक्त एका व्यक्तीला माजी सैनिकांना लागू असलेले १५% आरक्षण लागू राहील (सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक आरटीए-१०८२/३५०२/प्र.क्र.-१००/१६-अ, दिनांक २/९/१९८३)

८.१७.२ माजी सैनिंकाकरिता आरक्षणासंदर्भातील तरतुदी शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणा-या आदेशानुसार असतील.

८.१८ **प्रकल्प ग्रस्तांसाठी आरक्षण** :- शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक एईएम-१०८०/३५/१६-अ, दिनांक २० जानेवारी १९८० तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळावेळी नमूद करण्यात येणा-या आदेशानुसार प्रकल्प ग्रस्तांसाठीचे आरक्षण राहील.

८.१९ **भूकंप ग्रस्तांसाठीचे आरक्षण** :- शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक भूकंप-१००९/ प्र.क्र.२०७/२००९/१६-अ, दिनांक २७ ऑगस्ट २००९ तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणा-या आदेशानुसार भूकंप ग्रस्तांसाठीचे आरक्षण राहील.

८.२० **पदवीधर अंशकालीन कर्मचारी यांच्याकरीता आरक्षण** :- शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक पअंक-१००९/प्र.क्र.२००/२००९/१६-अ, दिनांक २७ ऑक्टोबर २००९ तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळावेळी जारी करण्यात येणा-या आदेशानुसार पदवीधर अंशकालिन कर्मचारी यांच्याकरिता आरक्षण राहील.

८.२१ **रोजंदारी मजूर** :- शासन निर्णय, महसूल व वनविभाग क्रमांक वनम-२०१३/प्र.क्र.३३४/फ-९, दिनांक १६/१०/२०१२ अन्वये वनविभागातील रोजंदारी मजुरांना १०% आरक्षण लागू राहील. लेखी परीक्षेत पात्र झालेल्या रोजंदारी मजुरांने त्यांच्या सेवेबाबत, मूळ कागदपत्रांच्या तपासणीच्या वेळेस त्यांना

संबंधित वन विभागातील उप वनसंरक्षक / विभागीय वन अधिकारी यांचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

८.२२ आरक्षित पदांकरिता उमेदवारांनी जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे वैधता प्रमाणपत्र शासन निर्णय बीसीसी-२०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब, दिनांक १२.१२.२०११ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करणे बंधनकारक राहील.

## ९. **सेवा प्रवेशोत्तर शर्ती** :-

**९.१** हिंदी आणि मराठी भाषा परीक्षे संबंधी केलेल्या नियमानुसार जर ती व्यक्ती अगोदर परीक्षा उत्तीर्ण झाली नसेल किंवा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसेल तर ती परीक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक राहील.

**९.२** महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहीत केलेले संगणक हाताळणीबाबतची प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक राहील.

**९.३** लघुलेखक (उच्चश्रेणी) (गट ब) (अराजपत्रित), लघुलेखक (निम्नश्रेणी) (गट ब) (अराजपत्रित), कनिष्ठ अभियंता (गट ब) (अराजपत्रित), वरिष्ठ सांख्यिकी सहाय्यक (गट-क) व कनिष्ठ सांख्यिकी सहाय्यक (गट-क) या पदावर नियुक्त झालेली व्यक्ती संबंधीत महाराष्ट्र राज्यात कोठेही बदलीस पात्र राहील.

**९.४** महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम १९८१ व शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या अधिसूचना, शासन निर्णय, परिपत्रके व शुध्दीपत्रकामधील तरतुदी उमेदवारांस बंधनकारक राहतील.

**९.५** शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक अनियो/१०/०५/१२६/सेवा-४, दिनांक ३१/१०/२००५ नुसार दिनांक १/११/२००५ रोजी व त्यानंतर निवड होणा-या उमेदवारांचा नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना (सध्या राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना) लागू राहील.

**९.६** लघुलेखक (उच्चश्रेणी) (गट ब) (अराजपत्रित) व लघुलेखक (निम्नश्रेणी) (गट ब) (अराजपत्रित) या पदावर नियुक्ती झालेल्या उमेदवारांना महाराष्ट्र नागरी सेवा (इंग्रजी लघुलेखक व मराठी टंकलेखकांसाठी मराठी लघुलेखनाची व मराठी टंकलेखनाची सक्तीची परीक्षा) नियम १९९९ मधील तरतुदीनुसार ज्यांचे लघुलेखन इंग्रजीमध्ये आहे त्यांनी तदर्थ मंडळाची मराठी लघुलेखनाची प्रति मिनिट ८० व टंकलेखनाची प्रति मिनिट ३० शब्द वेगाची परीक्षा सदर नियमात नमूद मुदतीत उत्तीर्ण करणे आवश्यक राहील.

## १०. **इतर महत्वाच्या सूचना** :-

**१०.१** निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर अयशस्वी ठरलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केला जाणार नाही किंवा त्यांना लेखी सूचना दिली जाणार नाही.

**१०.२** उमेदवारांनी त्यांच्या उमेदवारीच्या संबंधात कोणत्याही प्रकारचा वशिला किंवा दबाव आणण्याचा किंवा गैरप्रकारचा अवलंब केल्यास त्याची उमेदवारी अपात्र ठरवली जाईल.

**१०.३** भरतीप्रक्रिया/परीक्षा स्थगित करणे किंवा रद्द करणे, अंशतः बदल करणे तसेच भरती प्रक्रिये संदर्भात वाद, तक्रारीबाबत अंतिम निर्णय घेणे, पडताळणीअंती अर्ज रद्द ठरविणे, निवड

प्रक्रियेत वेळेवर बदल करणे, उमेदवारांची निवड यादी व प्रतीक्षा यादीस मान्यता देणे, जाहीरातीच्या अनुषंगाने योग्यती कार्यवाही करणे याबाबतचे संपूर्ण अधिकार राज्यस्तरीय निवड समितीला आहेत.

१०.४ उमेदवारांना परीक्षेकरिता, कागदपत्रे पडताळणीकरिता कोणत्याही प्रकारचा भत्ता व प्रवास खर्च अनुज्ञेय राहणार नाही.

१०.५ भरती प्रक्रियेदरम्यान उमेदवार कोणत्याही कारणास्तव गैरहजर असेल तर असे उमेदवार भरती प्रक्रियेतून बाद ठरतील व परीक्षा शुल्क नापरतावा राहील.

१०.६ मूळ प्रमाणपत्रे / कागदपत्रे, कागदपत्र पडताळणीच्या दिनांकाच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे. तसे न केल्यास उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.

१०.७ उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज भरतांना दिलेले भ्रमणध्वनी क्रमांक (मोबाईल क्रमांक) व **ई-मेल** आयडी कृपया भरती प्रक्रिया संपेपर्यंत बदलू नयेत.

१०.८ ऑनलाईन पध्दतीने आवेदन अर्ज भरण्यापूर्वी उमेदवाराने विस्तृत जाहीरातीचे काळजीपूर्वक वाचन करावे. जाहीरातीतील सूचना पूर्णपणे वाचूनच ऑनलाईन अर्ज भरण्याची दक्षता उमेदवारांनी स्वतः घ्यावी.

१०.९ चुकीची / खोटी प्रमाणपत्र सादर करणारा उमेदवार कायदेशीर कारवाईस पात्र राहील, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

१०.१० शासकीय व निमशासकीय कर्मचारी यांना ऑनलाईन परीक्षेमध्ये अर्ज करावयाचे असल्यास तो त्यांच्या कार्यालय प्रमुखाच्या परवानगीने विहीत मार्गाने व विहीत मुदतीत भरणे आवश्यक राहील.

सदर जाहिरात मा. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

दिनांक :८/६/२०२३
नागपूर

(डॉ. कुमारस्वामी एस.आर.)
उपवनसंरक्षक
(मानव संसाधन व्यवस्थापन), नागपूर

## परिशिष्ट-१

## निवड प्रक्रियेचे टप्पे

| अ.क्र. | टप्पा |
|---|---|
| १ | २ |
| १ | ऑनलाईन अर्ज स्वीकारणे |
| २ | प्रवेश पत्र / हॉल तिकीट निर्गमित करणे |
| ३ | ऑनलाईन परीक्षा |
| ४ | ऑनलाईन परीक्षेच्या अनुषंगाने आदर्श उत्तरपत्रिका वेबसाईटवर प्रसिध्द करणे |
| ५ | आदर्श उत्तरपत्रिकेच्या अनुषंगाने चुकीच्या छापलेल्या प्रश्नाविरूध्द आक्षेप (असल्यास) प्राप्त करणे |
| ६ | ऑनलाईन परीक्षेचा निकाल जाहीर करणे |
| ७ | कागदपत्रे तपासणी |
| ८ | व्यावसायिक परीक्षा (आवश्यकता असल्यास) |
| ९ | एकूण गुणांचे आधारे निवड यादी व प्रतीक्षा यादी वेबसाईटवर जाहीर करणे |

***************

# परिशिष्ट-२

## लहान कुटुंबासाठी प्रतिज्ञापत्र

मी श्री/श्रीमती/कुमारी ------------------------------------------ श्री ---------------------यांचा/यांची मुलगा/मुलगी/पत्नी, वय ------ वर्ष --------- राहणार ----------------------------याद्वारे पुढील प्रमाणे असे जाहीर करतो/करते की,

१. मी --------------------------- या पदासाठी माझा अर्ज दाखल केला आहे.

२. आज रोजी मला-----------------------(संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक २८.३.२००५ नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ----------- इतकी आहे (असल्यास जन्म दिनांक नमूद करावा.)

३. हयात असलेल्या मुलांची संख्या २ पेक्षा अधिक असेल तर दिनांक २८.३.२००५ वा तदनंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदासाठी मी अपात्र ठरविण्यास पात्र होईन, याची मला जाणीव आहे.

दिनांक :- **अर्जदाराची स्वाक्षरी**

स्थळ :-

**नांव** :-